# राशिभविष्य - एप्रिल , २०१६.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==================================================

**(१) मेष-** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. एकूण सर्व ग्रहांची स्थिती प्रतिकुलतेकडे च आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवूनच व नम्रतेचे आचरण करूनच हा प्रतिकुल काळ व्यतीत केलापाहिजे. ' महापुरे झाडे जाती , तेथे लव्हाळे वाचती ' हे तुकोबांचे वचन धानात घेऊनच सदैव आचरण करा. या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक अनारोग्य निर्माण करणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. आर्थिक व्यवहार जपून, सावधानतेने करा. या महिन्याच्या काळात आर्थिक चिंताच मनस्ताप देण्याची शक्यता वाटते. या राशीची मंडळी काही अपवाद वगळता अहंकारी व तापत स्वभावाची असतात. म्हणून सांगावेसे वाटते की अकारण कोणाशी शत्रुत्व करू नका. अविचाराने कोणतीही कृती करू नका. जिद्द कराल तर तुम्हालाच असह्य मनस्ताप व अनारोग्याला सामोरे जावे लागेल. अनुकुल काळात काय साध्य करावयाचे त्यासंबंधी योजना आखण्यास हरकत नाही. मात्र उतावीळपणे कोणतीही कृती करू नका. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे. लागेल. न प्रतिक्रिया व्यक्त करता सर्व काही सहन करा. तेच सुखाचे होईल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेषच काळजी घेतली पाहिजे. उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील जपा. अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे . पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते, या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. दलाली कमिशनवर व्यवसाय असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल होईल. श्रीगणेश उपासना करा. मन:शांती मिळेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणार आहे. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. मानसिक रोग तज्ञव द्रव पदार्थाचे व्यापारी तसेच बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत् र यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही युवकांना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मी येईल. पण त्यांनी तसा विचार करू

नये. सध्या आहे ती नोकरीच व्यवस्थित करावी. राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. पण गुरूमुळे फारसा त्रास होणार नाही. तरीही नातेवाईकमंडळीकडून त्रास होणे संभवते. काहीना स्थावर खरेदी-विक्रीतून अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणानी मन अस्वस्थ राहील. त्यामुळे काहीना मानहानीमुळे गहरे नैराश्य येणे संभवते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि-मंगळामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. स्वत:च्या आरोग्याची घ्यवी. तसेच कुसंगतीपासून दूर राहावे. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना व शिवोपासना अनुकुल होईल.

(३) **मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक जाईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकूल आहे. तसेच शिक्षणक्षेत्र , बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांनाही काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा शेवटचा सप्ताहच अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. तसेच पवित्र स्थळी यात्रेला जाणेही शक्य दिसते. औषध विक्रेती , वैद्यकीय व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी, वकिली व्यवसाय असणारानाही संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात गुरु-शुक्र शुभ योगामुळेमनोनुकुल घटना घडतील व आर्थिक लाभ होणेही शक्य दिसते. अध्यात्माची मनापासून आवड असणारांना कुलदेवतेची व श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व सात्विक सुखशांती लाभेल. या राशीच्या काही मंडळीकडून ढोंगी आचरण (वरून कीर्तन ,आतून तमाशा) होणे संभवते. पण तसे करू नका. त्याचा तुम्हालाच त्रास होईल. जपा. काही मंडळीना कोर्टकचेरीचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना वात्विकाराचा तर काहीना उष्णताविकाराचा त्रास होण्याची शक्यता दिसते. ताप येणे, फोड येणे, रक्तविकार किंवा हृदयविकाराचा त्रास होणे शक्य दिसते. जपा. काहीना अपप्रचाराचात्रास तर काहीना आर्थिक हानीचा त्रास होणे संभवते. काहीना भावंडापासून त्रास होईल तर काहीना दूरत्वामुळे बंधुसुख मिळत नसल्याचे दु:ख होईल. जपा. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा.

(४) कर्क - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ कधी आसू तर कधी हसू अशा प्रकारचे अनुभव देणारा असेलसे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल, तर उत्तरार्ध मनोनुकुल घटनांनी युक्त असा असल्याचा अनुभव येईल. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतीकारक व यशदायक होईल. काहीना प्रसिद्धी , मानसन्मान मिळणे संभवते. काहीना गुरुकृपा प्राप्त होईल . पण नोकरदार मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धात घरीदारी विरोध, मानहानी, कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल व इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या ओळखी होतील व त्यातून अपेक्षित सुखकारक घटना घडतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात गुरु-शुक्र , राहू-शुक्र शुभ योगामुळे महिन्याचा अखेरचा सप्ताह खूपच आनंददायक जाण्याची शक्यता दिसते. पण कलाक्षेत्र असणारांना मात्र महिन्याचा अखेरचा सप्ताह प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या द्वितीय स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात विविध कारणांनी मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. तसेच काही मंडळीना आर्थिक समस्याना तोंड द्यावे लागेलसे दिसते. जलभय, विषभय आहे. जपा. राहू-केतू व शनी-मंगळ प्रतिकु ल असल्याने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच विविध कारणांनी संततिसुखही मिळणे अशक्य होईल. जपा. श्रध्दा असेल तर शिवोपासनामन:शांती देईल.

(५) सिंह - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात वैवाहिक जीवनातील सुख व गृहसौख्य या दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. अस्थिर मन, स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य, काल्पनिक चिंता अशापैकी कारणानी सुखात बाधा येणे संभवते. ज्यांची कोर्ट प्रकरणे असतील त्यांनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणानी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळीना घरी व नोकरीत मनस्ताप देणाऱ्या घटनानाच तोंड द्यावे लागेल. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. तसेच कुलदैवताच्या उपासनेत काळ व्यतीत

कराल तर निश्चितच मन:शांती लाभेल. अपघात भय आहे. जपा. शास्त्रीय संशोधन व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या ज्या मंडळीचा कलात्मक जीवनव्यवसाय आहे अशाना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मात्र त्यांना सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. आरोग्यस ंपन्नतेसाठी श्रीसूर्यनारायणाची उपासना करा.

(६) **कन्या** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे ल ागेल शनि-मंगळ हे दोन्ही विरोधी स्वभाव असलेले ग्रह एकत्र असल्याने व ते अनुकुल स्थानी असल्याने तुमच्या मनाची ओढाताण होणार आहे. या ओढाताणीत छोटेमोठे अपघात होणे संभवते. जपा. मनावर व विचारशक्तीवर संयम ठेवा, सहनशील व्हा आणि नम्रतेचे आचरण करा. तेच सुखाचे होईल; व अशा परिस्थितीत शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने व या विरोधी ग्रहांच्या सामर्थ्याने जे काय घडेल त्यात सुख माना. या र ाशीच्या युवकांना उत्तम नोकरी मिळू शकेल किंवा नवे मनपसंत कार्यक्षेत्र मिळू शकेल. महत्त्वाकांक्षा वाढेल, धैर्य , हिम्मत वाढेल. पण उतावळेपणे काही कराल तर नुकसानच होईल व नैराश्य येईल. तसे झाले तर काहीना उगीचच आपल्याला काही आजार झाल्या सारखे वाटेल. काल्पनिक चिंता त्रस्त करतील. जपा. काही मंडळीना भावंड विषयक एखादी चिंता त्रस्त करील. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, समाजकार्य करत असणारांना, आध्यात्माची आवड असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व शांती समाधान देणारा असा सिद्ध होईल. पण इतरांना फारसा अनुकुल होणार नाही. काही मंडळीना पोटविकार तर काहीना मूत्राशायविकारांचा आजार त्रस्त करील. शिवाय कौटुंबिक व वैवाहिक जीवनात विविध क ारणांनी मनस्ताप देणाऱ्या घटना गहरे नैराश्य आणतील जपा. अशाही परिस्थितीत या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेश गमनाची संधी मिळेल. शत्रूपासून रक्षण होईल व महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात विविध प्रकारे लाभ होतील. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन शांत ठेवील, व सात्विक सुख लाभेल.

(७) **तुळा** - शनि ग्रहाची साडेसाती संपण्यास आता काही महिन्यांचाच काळ शिल्लक राहिला आहे. तेवढा काळ श्रीहन ुमानाचीउपासना करा, मनावर व विचारशक्तीवर ताबा

ठेवा, सहनशीलपणे आचरण करून उर्वरित काळ व्यतीत करा. शनि-मंगळ युतीचा काळ असह्य मनस्ताप देणारा आहे. या महिन्याच्या काळात आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता त्रास करील. तसेच कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावतील. काहीना पोटाचे विकार त्रस्त करतील. तसेच काही मंडळीना मुदतीचा ताप येणे, डोके दुखणे, किंवा मेंदूचा आजार होणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता वाटते. जपा. या महिन्याचा काळ आध्यात्मिक उपासनेस अनुकुल आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असल्याचा अनुभव येईल. विविध कारणांनी संततिसुखात व वैवाहिक जीवनात बाधा येणे संभवते. जपा. शासकीय नोकरदार मंडळीपैकी ज्यांना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे अशांनी मनावर ताबा ठेवून तसे आचरण करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. विवाहेच्छूचे विवाह ठरण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मनोनुकुल घटना घडण्याची शक्यता आहे.

**(८) वृश्चिक** - हटटी, संतापी स्वभाव व मानापमान फार अशा वृत्तीमुळे व सध्या मनावर ताबा नसल्यामुळे या राशीच्या मंडळीचे आचरण हेकट, उद्धट अशा प्रकारचे होत असावे, असे वाटते. तसेच अकारण श्रम , दगदग होत असावी असेही वाटते. त्यात भर म्हणून शनि-मंगळ हे व विरोधी स्वभावाचे ग्रह या मंगळ ग्रहाच्या राशीतच एकत्र आल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असाव्यात व मनाची ,विचाराची ओढाताण होत असली पाहिजे. याचा परिणाम शारीरिक आरोग्य बिघडण्यात होत असला पाहिजे. काळ शनी ग्रहाच्या साडेसातीचा आहे ही गोष्ट सतत ध्यानात घेऊन या राशीच्या मंडळीनी मनावर संयम ठेवून व विचारावर ताबा ठेवून आणि नम्रतेचे आचरण करूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला केला पाहिजे. या महिन्यात विविध कारणानी कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनात बाधा येणे संभवते. हाती घेतलेल्या कार्यात अडचणी अडथळे निर्माण होणे संभवते. कोणी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या तर चालणार नाही व पटणारही नाही. असो. या महिन्याचा उत्तरार्धच या राशीच्या नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. कर्तृत्ववान मंडळीना बढती, अधिकार

मिळू शकेल किंवा कोणाचा सन्मान होणेही शक्य दिसते. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना व कलाकारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. महिन्याचा पूर्वा र्ध नोकरदार मंडळीना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. त्यामुळेच सात्विक सुखसमाधान मिळेल.

**(९) धनु** - सध्या या राशीच्या मंडळीचे मन कोमल व अत्यंत भावनाशील असे झाले असण्याची शक्यता वाटते. अशा परिस्थितीत या शनि ग्रहाच्या साडेसातीच्या काळात थोडेही मनाविरुद्ध काही घडले तरी ते सहन करणे कठीण जात असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीनी सतत सावधानतेने, विचारपूर्वक आचरण करणेच सुखाचे होईल. मनावर ताबा ठेवा, सहनशील व्हा आणि कोणाबद्दलही आपले मत वा विचार व्यक्त करू नका. नम्रतेचे आचरण करा. कारण या महिन्याचा काळ नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने, कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल असाच आहे. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक , सावधानतेने व फसवणूक वा नुकसान होणार नाही ना ते तपासूनच करा. विचाराच्या तंद्रीत वाहन चालवू नका. अपघात भय आहे. जपा. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी आल्या तरी निराश न होता हळू हळू त्यातून मार्ग शोधण्याचा प्रयत्न करा. अध्यात्मात रस, श्रद्धा असेल तर आध्यात्मिक जीवन जगण्याचा प्रय त्नच शांती, समाधान देऊ शकेल. नवीन काही करण्याच्या भानगडीत पडू नका. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद, वाद होणे संभवते. जपा. घरी मुलांच्या समस्या, स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. काही जुनी, दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा मनस्ताप काही मंडळीना सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. अशा प्रतिकुल परिस्थितीतही शभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहीना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल.

**(१०) मकर** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तरीही विविध कारणांनी आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता वाटते. त्यामुळे आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची समस्या, आर्थिक घोटाळे होणे, येणे वसूल न होणे अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेले शनि-मंगळ हे विरोधी स्वभावाचे ग्रह असले तरी फारसे

त्रासदायक होणार नाहीत. केवळ मैत्रीत वितुष्ट येणे, अर्थप्राप्तीसाठी कष्ट, परिश्रम करावे लागणे, संततिसुखात बाधा येणे, या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. तरीही या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होण्याची शक्यता वाटते. महिन्याचा उत्तरार्ध मात्र घरीदारी मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. अनारोग्याचा त्रास , नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, दिरंगाई होणे, वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करणे, त्यामुळे नैराश्य येणे संभवते. नोकरीत वरिष्ठांचा त्रास तर घरी कौटुंबिक वाद, भांडणे, गैरसमज यांमुळे डोके भणाणून जाईल. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून, सहनशील बनून , नम्रतेचे आचरण करून व मौन व्रत धारण करूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे सुखाचे होईल. शिवायफारसे अनारोग्यही होणार नाही. अशा प्रतिकुल काळातही ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहीना अशा प्रकारचा धनलाभ होऊ शकेल किंवा वारसाहक्काने धनलाभ होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल .

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत हळवे झाले असावे, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही शीघ्र होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. तसेच विचारशक्ती अत्यंत अस्थिर, चंचल झाली असेल तर अविचारी विक्षिप्त आचरण होत असावे, असे वाटते. बोलणेही फटकळ होत असावे. मिळकतीपेक्षा अधिक कराव्या लागणाऱ्या खर्चाची चिंता, आर्थिक फसवणूक आर्थिक नुकसान अशापैकी कारणानी असह्य मनस्ताप होत असावा. अशा परिस्थितीत शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचे आजार त्रस्त करत असतील. विशेष करून डोळ्याचे आजार अधिक प्रमाणात होणे संभवते. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखात फारशी बाधा येणार नाही, असे वाटते उलट कुटुंबात शुभ घटनाच अधिक घडत असतील. पण या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. नोकरदार मंडळीना बढती, वेतनवाढ असे काही लाभ मिळण्याची शक्यताही दिसते पण हितशत्रूंचाही त्रास होणे संभवते, जपा. विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह ठरण्याची शक्यता आहे. काहींचे प्रेमसंबंध वाढतील.

पण राहूमुळे काहींच्या वैवाहिक जीवनात बाधा निर्माण होणे संभवते. कोळसा, लोखंड विक्रेते , औषध विक्रेते , वैद्यकीय व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. पण अन्य व्यावसायिकांच्या व्यवसायात अडथळे निर्माण होणे संभवत े संततिसुख लाभेल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल व सुखसमाधान देऊ शकेल.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव लहर ी अस्थिर, चंचल असा झाला असावा, असे वाटते. शिवाय कोणी समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या, उपदेश केला तर ते सहन होता नाही. अशा परिस्थितीतनियोजित कार्यात अडथळे येणे, अपयश येणे, फसवणूक होणे, आर्थिक नुकसान होणे, आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता वाटणे अशा घटना घडण्याची शक्यता आहे. रक्तदाब, हृदयविकार असणाऱ्या मंडळीनी तर अति विचार न करता मन शांत राखण्याचा प्रयत्न करावा. तरच अनारोग्य होणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या लहान मुलांच्या पालकांनी जपावे. मुले हूड, व्रात्य होणे संभवते. अशा प्रतिकुल परिस्थितीतही बुध-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, अर्थलाभ होईल व दिलासा मिळेल. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक सबंध आहे, अशांना अशा संबंधामुळे अधिक अर्थलाभ होणे संभवते. शुक्रामुळे या राशीच्या मंडळीना कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या किंवा परदेश प्रवासाची संधी मिळेल. पण अशा प्रवासात त्रास , मनस्ताप होणे संभवते. जपा. गुप्त पोलीस खात्यात नोकरी करत असणारांना काळ अनुकुल व यशदायक होईल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ नियमितपणे पठण करा.

=====000O000=====